GAP भाषा
A MULTILINGUAL JOURNAL OF RESEARCH
( ISSN – 2582-8770 )
Globally peer-reviewed and open access journal.

# संस्कृत साहित्यातील स्त्री


## लीना पांडे

संशोधन अभ्यासक

E-mail ID: leenaspande@gmail.com

Mob. No. 8087108061



### *सारांश*

*संस्कृत साहित्याची परंपरा अत्यन्त प्राचीन आहे. ती साक्षी आहे भारतीय समाजामध्ये स्त्रीचे स्थान अत्यन्त गौरवपूर्ण असल्याचे भारताचा मध्यकालीन आणि वर्तमान समाज स्त्रीच्या परिस्थितीला घेऊन अनेक प्रश्नांनी वेढलेला आहे. मात्र प्राचीन संस्कृत साहित्यामध्ये स्त्रीचे स्थान अत्यन्त गौरपूर्ण होते आणि हेच वर्तमान समाजाला पुन्हा पटवून सांगण्याची परिणती म्हणजेच प्रस्तुत शोध निबन्ध होय.*


### हेतू, उद्देश

प्राचीन संस्कृत साहित्यातील स्त्रीच्या गौरवपूर्ण स्थानाची वर्तमान समाजाला जाणीव करून देणे.

### संशोधन पद्धती

प्रस्तुत शोध निबंधाकरिता विवेचनात्मक शोध पद्धतीचा अवलंब केला आहे.

**वागर्थाविव संपृक्तो वागर्थप्रतिपत्तये।।**
**जगतः पितरौ वन्दे पार्वतीपरमेश्वरौ।।** [1]

रघुवंशम् महाकाव्यातील उद्धृत या पंक्ती समाजातील स्त्री-पुरूष समानतेच्या परिचायकच होय. भारतीय संस्कृती अर्धनारीश्वरच्या परम्परेने ओतप्रोत आहे. म्हणजेच समाजामध्ये महिला आणि पुरूषाचे समान स्थान असायला हवे. या भावनेचा आदरण करणारे.

वैदिक साहित्यामध्ये स्त्रीचे गृहस्थाश्रमामध्ये अती महत्वपूर्ण स्थान होते. दुहितेच्या रूपामध्ये, पत्नी किंवा आईच्या रूपामध्ये ती सर्वथा सम्मान योग्यच होती. 'जायेदस्तम्' जाया हीच घर होय. 'गृहिणी गृहमुच्यते'ची भावना ऋग्वेदीय युगामध्ये चांगलेच घर करून रूजली होती. स्त्री ही सहधर्मिणी होती, तिच्यासोबतच धार्मिक कार्याचे अनुष्ठान संपन्न होत असे. आणि म्हणूनच अपत्नीक व्यक्ती यज्ञाच्या अधिकारापासून वंचित असे -

'अयज्ञो वा एषः योऽपत्नीकः।' [2]

https://www.gapbhasha.org/

( ISSN – 2582-8770 )
Globally peer-reviewed and open access journal.

ऋग्वेदाचे ऋषीगण पत्नीचे गुण, पति प्रेम तसेच दैनिक परिचर्या यांचे कौतुक करतांना ते कधी थकत नसे. स्त्रिया फक्त गृहस्थीच्याच स्वामिनी नव्हत्या तर, त्यांचे त्यांच्या पतिवरही पूर्ण प्रभुत्व राहत असे. ती गृहलक्ष्मी मानल्या जात असे, अनेक महत्त्वाच्या निर्णय प्रसंगी तिची सम्मती घेतली जात.

बालविवाहाची प्रथा अस्तित्वात नसल्यामुळे यौवन अवस्थेमध्ये पदार्पण करण्याच्या पुर्वि त्यांना शिक्षा प्राप्तिचा पूर्ण अवसर मिळत असे. ऋग्वेदातील अनेक सूक्त स्त्रीयांच्या द्वाराच आविष्कृत आहेत. ब्रम्ह वादिनी घोषा हिने दशम मण्डलामध्ये ३९ साव्सा तसेच ४० साव्या सूक्तांचा साक्षात्कार केला होता. अश्या प्रकारे इन्द्राणी, अपाला, सूर्या आदि यांनी सुद्धा मंत्राचे दर्शन केले होते. स्त्रियांना वैदिक समाजामध्ये पूर्ण सम्मान होता. पुरूषांप्रमाणेच स्त्रियासुद्धा वैदिक मन्त्रांनी प्रतिदिन संध्या करित असे. रामायणामध्ये सुद्धा सीतेचे संध्याकरण्याचे वर्णन प्राप्त होते.

**‘संध्याकाल मनाः श्यामा ध्रुवमेण्यति जानकी।**
**नदीं चेमां शुभ्रजलांसध्यार्थं वरवर्णिनी।।’**[3]

वैदिक साहित्यामध्ये स्त्रीयांना मातृरूपाचे विशिष्ट स्थान आहे. ऋग्वेदामध्ये मुला-मुलींनी युक्त तसेच स्वर्णाभूषणांनी अलङ्कृत पूर्णायु दम्पती असणा-या परिवाराला सुखी परिवार मानले आहे.

‘पुत्रिणा ता कुमारिणा विश्वमायुर्व्यश्नुतः
उभा हिरण्यपेशसा।[4]

तैत्तिरीय उपनिषदाच्या अधिप्रज अर्थात् प्रजाविषयक संहितेमध्ये आईला पूर्वरूप मानले आहे.

**‘माता पूर्वरूपं पितोत्तररसम् ।प्रजा संधिः।**[5]

तसेच आईला देव मानवण्याची शिक्षा दिल्या गेली आहे.

**‘मातृदेवो भव। पितृदेवो भव। आचार्यदेवो भव।**[6]

वैदिक वाङ्मयामध्ये उपलब्ध या प्रशंसनीय भमिकेचे संस्कृत साहित्यामध्येही स्वागत केले आहे. महाभारतामध्ये आईला - परमगुरू संबोधिले आहे.

**‘गुरूणां चैवसर्वेषां माता परमको गुरूः।**[7]

बृहदारण्यक उपनिषदामध्ये विदुषी तसेच दीर्घायु पुत्री प्राप्तिची कामना करणा-या दम्पत्ती करिता औषधि विशेषाचे विधान आले आहे.

**‘अथ य इच्छेद् दुहिता में पण्डिता जायेत सर्वमायुरियादिति**
**तिलौदनं पाचयित्वा सर्विष्मन्तम श्रीयातामीश्वरौ जनयितवे।’** [8]

हे विधान लोकांच्या या धारणेचे निर्मूलन करते की वैदिक साहित्यामध्ये मुलीच्या जन्माच्या इच्छेचा अभाव होता. कन्येला महत्त्व देण्याच्या या वैदिक विचारधारेचा प्रभाव संस्कृत साहित्यामध्ये सुद्धा दिसून येतो. महाभारतामध्ये मुलींना लक्ष्मीचा

https://www.gapbhasha.org/

निवास असे म्हटले आहे.

**'नित्यं निवसते लक्ष्मीः कन्यकासु प्रतिष्ठिता।**[9]

रामायणामध्ये तर कन्येच्या दर्शनाला कल्याणकारी शकुन मानले आहे. वनवासातून परत आलेल्या रामाचे स्वागत तसेच अभिषेक कन्या करतात आणि त्यानंतरच त्यांचे विश्वासपात्र सेनापती आणि मन्त्री करतात. [10]

उपर्युक्त विवेचनावरून असा निष्कर्ष तर नक्कीच काढल्या जाऊ शकते की, वैदिककाळ स्त्रीयांकरिता स्वर्णयुग होते.

कविकुलगुरू कालिदासाच्या साहित्यामध्ये तर भारतीय संस्कृतीचे प्रतिबिंब आहे. ती अभिज्ञानशाकुन्तलची शकुन्तला असो, की 'कुमारसंभवम्' मधील रति किंवा पार्वती असो, रघुवंश महाकाव्यातील सुदक्षिणा असो किंवा इन्दुमती, 'मेघदूतामधील यक्षप्रिया असो, की 'विक्रममोर्वशीयम्' मधील उर्वशी. स्वतःला क्रीतदास म्हणवून घेणा-या शिवाची अर्धांगिणी बणून भगवती पार्वती सर्व सौभाग्यवती स्त्रीयांकरिता एक स्पृहणीय आणि आदर्श बनली.

सुदक्षिणा चक्रवर्ती सम्राटाची पटराणी आहे, मात्र तरीसुद्धा गुरू वशिष्ठाच्या आश्रमामध्ये नंदिनीची सेवा स्वतः करते. भारतीय स्त्रीकरिता उच्चादर्शाची स्थापना करणारी महनीय स्त्री गौरवाची संरक्षिका आहे ती. अभिज्ञानशाकुन्तलेमध्ये राजा दुष्यन्त शकुन्तलेसोबत गान्धर्व विवाह करतात. यावरून असे स्पष्ट होते की, त्यावेळी 'गान्धर्व' विवाह पद्धती अस्तित्वात होती. आणि म्हणूनच महर्षि कण्वांनी सुद्धा त्याचे अनुमोदन केले ओह. तसेच महर्षि कण्वांच्या आश्रमामध्ये ब्रम्हचारिणी सुद्धा राहतात. यावरून असे स्पष्ट होते की, त्यावेळी स्त्रिया सुद्धा ब्रम्हचर्य व्रताचे पालन करत. आश्रमामध्ये निवासाच्या अधिकारिणी होत्या. उदा. तपस्विनी गौतमी आदि.

शकुन्तला ज्यावेळी पतिगृही जाण्याकरिता निघते. त्यावेळी अरण्यवासी असून सुद्धा लौकिक व्यवहाराचे ज्ञाता कण्व मुलीला सांगतात की, पतिकुळामध्ये जाऊन

**शुश्रूषस्व गुरून् कुरू प्रियसखीवृत्तिंसपत्नीजने**
**भर्तुर्विप्रकृताऽपि रोषणतया मास्म प्रतीपं गमः।**
**भूयिष्ठं भव दक्षिणा परिजने भाग्येष्वनुसेकिनी**
**यान्त्येवं गृहिणीपदं युवतयो वामाः कुलस्याधराः।।**[11]

गौतमी सुद्धा त्याचे समर्थन करते.

**अर्थात** - सासु-सासरे, गुरूजन मंडळीची सेवा करशील, सवतीसोबत सखीचा भाव ठेवशील, पतिच्या प्रतिकूल व्यवहारावर सुद्धा क्रोधाने प्रतिकार नको करशील, परिजनांबरोबर दाक्षिण्यभाव ठेवशील, स्वतःच्या भाग्यावर कधी अभिमान करशील नको. अश्याप्रकारे स्त्रिया 'गृहलक्ष्मी' पद प्राप्त करतात, यांच्या विपरीत आचरण करणा-या स्त्रिया कुलाकरिता मानसिक व्याधि होतात. हा उपदेश आजही तेवढाच महत्त्वाचा आहे. जेवढा आधी होता.

गौतमी आणि शार्ङ्गरव यांच्यासोबत शकुन्तला दुष्यन्ताच्या राजदरबारात जाते. प्रतिहारी राज्याला म्हणतो -

**'ननु दर्शनीया पुनरस्या आकृतिर्लक्ष्यते।'**[12]

त्यावर राजा लगेच उत्तर देतो -

**'भवन्तु । अनिर्वर्णनीय परकलत्रम्।**[13]

दुस-याच्या पत्नीला बघणे योग्य नाही काय आज असे संभव होऊ शकते? राजाचे हे उत्तर धर्मनीति सम्मत आहे. शकुन्तला अवगुंठन धारण करून आहे. त्यावेळी राजा तिला अवगुंठनवती म्हणतो. मात्र राजा ज्यावेळी तिला ओळखू शकत नाही. त्यावेळी

https://www.gapbhasha.org/

गौतमी तिला म्हणते -

**'जाते, मुहूर्त मा लज्जस्व । अपनेष्यामि तावत्**
**तेऽवगुणुनम् । ततस्त्वां भर्ताऽभिज्ञास्यति।'** [14]

यावरून असे स्पष्ट होते की कालिदासाच्या वेळी कुलशीलवती स्त्रीया अवगुंठन करत होत्या.

विक्रमोर्वशीय नाटकामध्ये काशीराज कन्या, देवी पुरूरवाची पट्टमहिषी आहे, मात्र राजा उर्वशीच्या प्रणयामध्ये रत आहे. एक पत्नी व्रत चा आदर्श इथे खण्डित झाला आहे.

भासाच्या 'स्वप्नवासवदत्तम्' नाटकमध्येही असेच आहे. हे नाटक संस्कृत साहित्याचे उज्ज्वलरत्न आहे. वासवदत्ता असून सुद्धा उदयनाची पद्मावतीसोबत प्रणयकथा यामध्ये गुंफली आहे. वासवदत्ता शील, संयम, उदारता, धैर्य तसेच प्रेमाची प्रतिमूर्ति आहे आणि आदर्श भारतीय नारी आहे, जी पतिच्याप्रति सर्वात्मना समर्पित आहे.

शूद्रकाचे प्रकरण 'मृच्छकटिकम्' याचा नायक ब्राम्हण चारूदत्त आणि नायिका उज्जयिनी ची गणिका वसन्तसेना आहे. गणिका आणि संस्कृत नाटकाची नायिका,काहीसे चुकल्यासारखे वाटते मात्र हे सत्य आहे. जरी वसन्तसेना गणिका आहे. मात्र चारूदत्ताप्रति तिचे प्रेम निष्कपट, प्रामाणिक आहे. राज्याचा साळा शकाराचे सर्व प्रलोभने ती धूडकावून लावते.

भारवि रचित महाकाव्या 'किरातार्जुनीयम्' मध्ये द्रोपदीच्या चरित्र्याच्या रूपामध्ये स्त्रीच्या चरित्र्याचे उदात्त आणि प्रभावोत्पादक चित्रण केले आहे. ब्रहस्पतिंना सुद्धा आश्चर्यचकित करणा-या युक्तियुक्त परंतु कठोर वाणीमध्ये द्रुपद सुतेने धर्मराज युधिष्ठिराला सम्बोधित करून जे काही म्हटले ते सर्व भारविची मेधा आणि नीतिमत्तेला व्यक्त करते. तसेच नारीच्या स्त्रीच्या प्रकर्षोज्ज्वल रूपाला सुद्धा प्रकट करते.

बाणभट्टांची संस्कृत साहित्यातील विश्ववंदीत कृति कादम्बरी यामध्ये बाणभट्टांनी रेखाटलेल्या स्त्रीपात्रांमध्ये स्निग्ध हृदया, विरहाविधुरा, महाश्वेता, तसेच सरल हृदय प्रकृष्ट मनोहरा गन्धर्व राजकन्या मुग्धा कादम्बरी चे ललित चरित्र सर्वकालीन रमणीयता, तसेच हृदयावर्जक अनुपम माधुर्याचे मनोहर संगम आहे.

महाकवी श्रीहर्षाची 'नैषधीयमरितम्' एक अनुपमा कृति आहे. यामध्ये श्रीहर्षाने दमयन्तीचे बाल भाव कौशोर्य कुमारीस्व, विवाह आणि विवाहान्तराची अवस्था याचे चित्रण केले आहे. दमयन्ती अपूर्व सून्दरी आहे. प्रतिभाशालिनी आणि सरलह्रदया धैर्यमूर्ति विनम्रतानत शील एवं संयमधारिणी आहे. ती स्त्री गौरवाची संवाहिका आहे. नलाचे वरण करण्याकरिता विदर्भ नन्दिनी स्वयंवराचे आयोजन करते इन्द्रादि देव नलालाच आपला दूर बनवून पाठवितात. मात्र ती विनम्रता पूर्वक त्यांचा प्रस्ताव धूडकावून देते, आणि नलाचे वरण करते.

यावरून आपण असा निष्कर्ष काढू शकतो की प्राचीन काळी भारतीय समाजामध्ये स्त्रीचे स्थान गौरवपूर्ण होते. तो काळ तिच्याकरिता सुवर्णकाळ होता.

आजही जर सर्वांनी स्वतःच्या धर्माचे योग्य पालन केले, मातृधर्म, पितृधर्म, पुत्रधर्म आदी तर भारताला पून्हा 'सोनेकी चिडीया' व्हायला वेळ लागणार नाही. बस, सर्वभारतीयांच्या मनात पुढील एकच भावना जागृत व्हायला हवी. आणि ही भावना आली की सर्वांकरिता सुवर्णयुग आलेच म्हणून समजा -

**यत्र नार्यस्तु पूज्यन्ते रमन्ते तत्र देवताः।**
**यत्रैतास्तु न पूज्यन्ते सर्वास्तत्राफलाः क्रियाः।।** [15]

https://www.gapbhasha.org/

## संदर्भ सूची

[1] रघुवंशम् 1/1

[2] तै. ब. 2:2:2:6

[3] रामायण 5/15/48

[4] ऋग्वेद, 8/15/8

[5] तै.उ.1/3

[6] तै.उ.1/11

[7] महाभारत 1/211/16

[8] बृ.उ. 6/4/17

[9] महाभारत 13/11/14

[10] 'रामायण 6/138/38 तसेच 61

[11] अभिज्ञानशाकुन्तलम् 4/18

[12] अभिज्ञाशाकुन्तलम् अंक 5

[13] अभिज्ञाशाकुन्तलम् अंक 5

[14] अभिज्ञानशाकुन्तलम् अंक - 5

[15] मनुस्मृति 3/56

https://www.gapbhasha.org/